राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार ५+३+३+४ आकृतीबंधातील शिक्षणाचे बालपणातील काळजी व शिक्षण (पायाभूत स्तर) शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण मधील घटकांचे अवलोकन करून राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६ /एसडी-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - २४ मे, २०२३.

**वाचा :**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९.

२. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

३. शासन निर्णय क्रमांक: अभ्यास २११६/(प्र.क्र. ४३/१६)/ एसडी-४, दिनांक २५ एप्रिल, २०१६.

४. महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुनर्रचना दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६

५. राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२०

६ शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४९/ एसडी- ६, दिनांक २४ जून, २०२२.

७. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर, दिनांक २० ऑक्टोबर, २०२२.

८. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१२/प्र.क.८८/ एसडी- ६, दिनांक १६ जानेवारी, २०२३.

**प्रस्तावना :**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीमध्ये नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. सदर राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी टप्याटप्याने सुरु आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "SARTHAQ" ही नियोजन पुस्तिका तयार करण्यात आली असून यामध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध संस्थांची जबाबदारी व त्यानुसार करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत २९७ कार्य (टास्क) देण्यात आलेले आहेत. संदर्भ क्रमांक ६ अन्वये राज्यात देखील राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी सर्व विभागाच्या समन्वयाने सुरू झालेली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये पूर्वीच्या १०+२+३ या रचनेमध्ये बदल करून ५+३+३+४ याप्रमाणे रचनात्मक बदल केला आहे. यामध्ये पायाभूत स्तरापासून उच्च

माध्यमिक स्तरापर्यंतच्या शिक्षणाचा समावेश केला आहे. संदर्भ क्र. ८ अन्वये सदर धोरणाची शासन स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी आंतरविभागीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र नियम, २०११ अन्वये शिक्षण प्राधिकरण म्हणून अभ्यासक्रम निर्मिती व मूल्यमापन प्रक्रिया याबाबतची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे या संस्थेची आहे. तसेच राज्यात इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य, शैक्षणिक ई-साहित्य, शिक्षक प्रशिक्षण, मूल्यमापन इत्यादीबाबत धोरण व निर्णय विविध संस्थांद्वारे चालते. यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी संदर्भ क्र.३ अन्वये स्थापित समितीद्वारे निर्णय घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. ४ नुसार राज्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी अभ्यासक्रम विकसन, पाठ्यक्रम विकसन, पाठ्य व इतर साहित्य विकसन, मूल्यमापन प्रक्रिया विकसन इत्यादीची जबाबदारी राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असल्याचे नमूद करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० मधील शिफारशींवर आधारित पायाभूत स्तरासाठीचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला असून यापुढे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण, प्रौढ शिक्षण व शिक्षक शिक्षण निर्गमित होणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील सूचनांना अनुसरून आपल्या राज्याच्या गरजा व वैशिष्ट्ये विचारात घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यांमध्ये आवश्यक बदल करून पायाभूत स्तर, शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण यासाठीचे राज्य अभ्यासक्रम आराखडे (SCF), पाठयक्रम व पाठयपुस्तक निर्मिती, ई-साहित्य विकसन, मूल्यमापन प्रक्रिया यासाठी मार्गदर्शन करणे व त्यास अंतिम मान्यता देण्याकरीता व एकूणच शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विधाराधीन होती.

**शासन निर्णय :**

केंद्रीय शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० लागू करण्यात आले आहे. सदर शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी टप्याटप्प्याने सुरु झालेली आहे. याचाच एक महत्वाचा भाग म्हणजे राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF) निर्मिती होय. राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० मधील शिफारशीनुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर (NCF-Foundational Stage) हा माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निर्गमित करण्यात आला आहे, तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण (NCF - School Education) मसुदा माहे एप्रिल, २०२३ मध्ये सूचना व प्रत्याभरणासाठी निर्गमित करण्यात आला आहे. यापुढे शालेय शिक्षणाकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा अंतिम आराखडा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शिक्षक शिक्षण (NCF- Teacher Education) व प्रौढ शिक्षण (NCF - Adult Education) यांचेसाठी निर्गमित करण्यात येतील. राष्ट्रीय - स्तरावरील सूचनांना अनुसरून राज्याच्या सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीचा विचार करून, राज्याच्या सद्यस्थितीतील गरजा, स्थानिक परिस्थिती व जागतिक आव्हाने

या सर्व बाबींचा सर्वकष विचार करून राज्यातही खालील चार प्रकारच्या भविष्यवेधी अशा राज्य अभ्यासक्रम आराखड्यांची निर्मिती करणे आवश्यक आहे.

१. राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर (SCF-FS).

२. राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण (SCF-SE)

३. राज्य अभ्यासक्रम आराखडा शिक्षक शिक्षण (SCF-TE)

४. राज्य अभ्यासक्रम आराखडा प्रौढ शिक्षण (SCF-AE)

२. उपरोक्त सर्व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यांचे अवलोकन करून आवश्यक बदलांसह राज्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा समावेश, शिफारस व मार्गदर्शन तसेच ५+३+३+४ या रचनेतील शैक्षणिक कार्याचे सनियंत्रण आणि सुसूत्रीकरण करण्यासाठी पुढील प्रमाणे सुकाणू समितीची स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री (शालेय शिक्षण) | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई. | सह अध्यक्ष |
| ३ | आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे. | उपाध्यक्ष |
| ४ | राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई. | सदस्य |
| ५ | आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, बेलापूर, मुंबई. | सदस्य |
| ६ | आयुक्त, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७ | आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, पुणे. | सदस्य |
| ८ | शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय (योजना) पुणे. | सदस्य |
| ९ | संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे. | सदस्य |
| १० | संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे. | सदस्य |
| ११ | संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | सदस्य |
| १२ | अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. | सदस्य |
| १३ | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे. | सदस्य |
| १४ | डॉ. वसुधा कामत, माजी कुलगुरू, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| १५ | डॉ. दिपक म्हैसेकर (सेवानिवृत्त भा.प्र.से.) | सदस्य |
| १६ | श्री.सुहास रघुनाथ पेडणेकर,मुंबई विद्यापीठ,माजी कुलगुरू | सदस्य |
| १७ | श्री. मिलिंद नाईक, प्राचार्य, ज्ञानप्रबोधिनी, पुणे | सदस्य |
| १८ | श्री. शेषाद्री व्यंकटेश डांगे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १९ | श्री. रमेश देविदास देशपांडे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २० | डॉ. महेश्वर गंगाधर कळलावे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २१ | डॉ. मधुश्री संजीव सावजी, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २२ | डॉ. अजय दिगंबर महाजन, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २३ | डॉ. अशोक भोसले, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २४ | श्री. श्रीपाद मथुराकांत ढेकणे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २५ | श्री. महादेव सखाराम जाधव, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २६ | श्री. नारायण वासुदेव मराठे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २७ | श्री. अंकेश ललितप्रसाद शाहू, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २८ | श्रीम. शोभना प्रकाश भिडे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| २९ | श्री.भरत सडकगावडे,सेवानिवृत्त शिक्षक | सदस्य |
| ३० | श्रीम. सुषमा प्रवीण मांजरेकर | सदस्य |
| ३१ | डॉ. नेहा जगटियानी, प्राचार्य नॅशनल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| ३२ | संचालक, राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव |

**उपरोक्त सुकाणू समितीची जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील-**

१. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर (NCF-FS), शालेय शिक्षण (NCF-SE), शिक्षक शिक्षण (NCF-TE) व प्रौढ शिक्षण (NCF-AE) चे अवलोकन करून त्यानुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF) निर्मितीसाठी शिफारशी करणे.

२. उपरोक्त चारही राज्य अभ्यासक्रम आराखड्या (SCF) नुसार विविध समित्या व उपसमित्या मधील सदस्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करून त्यास मान्यता देणे.

३. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील शिफारशीनुसार केंद्रीय शिक्षण मंत्रालय व NCERT, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासन व संबंधित मंत्रालयीन विभाग आणि अंमलबजावणी करणाऱ्या संस्था यांच्याशी समन्वय साधणे.

४. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या विविध संस्थांमध्ये सुयोग्य समन्वयाने समित्या व उपसमित्या तयार करून त्यातील सदस्यांना मार्गदर्शन व शिफारशी करणे.

५. संबंधित राज्य अभ्यासक्रम आराखडा, पाठयक्रम, पाठ्यपुस्तक, ई-साहित्य विकसन व मूल्यमापन निर्मितीसाठी तयार होणाऱ्या सर्व समित्या व उपसमित्यांना अंतिम मान्यता देणे. समिती सदस्यांना वेळोवेळी मार्गदर्शन, सूचना, शिफारशी करून राज्याच्या गरजाभिमुख घटकांचा अंतर्भाव राज्य अभ्यासक्रम आराखड्यात व पाठयक्रमात करणे आणि त्या अनुषंगाने पाठ्यपुस्तक व ई- साहित्य निर्माण करून मूल्यमापन करणे.

६. समिती व उपसमितीने तयार केलेले राज्य अभ्यासक्रम आराखड्यांचे (SCF) प्रारूप तपासून आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करून शासनाच्या धोरणांशी सुसंगत अशा आराखड्यास अंतिम रूप देणे.

७. NCF व SCF निर्मितीच्या घटकांमध्ये विषयानुसार अध्यापनशास्त्र, अभ्यासक्रम, मूल्यमापन, नवीन तंत्रज्ञान, एकविसाव्या शतकातील कौशल्ये, रंजकता, अध्ययन ओझे व इतर यासारख्या राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० मधील महत्वाच्या मुद्द्यांवर आधारित घटकांचा राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये अंतर्भाव करणे.

८. पायाभूत स्तर (बालशिक्षण) ते बारावीपर्यंतच्या सर्व इयत्तांच्या अभ्यासक्रमात, पाठ्यक्रमात, पाठ्यपुस्तक निर्मिती, ई-साहित्य विकसन आणि मूल्यमापन प्रक्रियेमध्ये सुसंगतपणा व सलगता यावी याद्दष्टीने मार्गदर्शन करणे.

९. राज्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० क्रियान्वयनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक व पुरक- पोषक रचना / व्यवस्था निर्माण करून त्याचे संचालन व संनियंत्रण करणे.

३. सदर सुकाणू समितीचा कार्यकाळ हा राज्य अभ्यासक्रम आराखडा, अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठ्यपुस्तक निर्मिती, ई-साहित्य विकसन आणि प्रत्येक टप्प्यावरील किमान सुरुवातीची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण होऊन त्यास शासन मंजुरी मिळेपर्यंत राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०५२४१८३४५६८९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

IMTIYAZ MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.05.24 18:37:21 +05'30'

**(इ.मु. काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र, मुंबई,
५. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र, मुंबई,
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय्य सहाय्यक
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
९. आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, बेलापूर, मुंबई.

१०. आयुक्त, आदिवासी विकास विभाग
११. आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, पुणे.
१२. शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय (योजना) पुणे.
१३. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे.
१४. संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे.
१५. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१६. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१७. संचालक, राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
१८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
१९. डॉ. दिपक म्हैसेकर (सेवानिवृत्त भा.प्र.से.)
२०. श्री.सुहास रघुनाथ पेडणेकर,मुंबई विद्यापीठ,माजी कुलगुरू
२१. डॉ. वसुधा कामत, माजी कुलगुरू, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
२२. श्री. मिलिंद नाईक, प्राचार्य, ज्ञानप्रबोधिनी
२३. श्री. शेषाद्री व्यंकटेश डांगे, शिक्षण तज्ज्ञ
२४. श्री. रमेश देविदास देशपांडे, शिक्षण तज्ज्ञ
२५. डॉ. महेश्वर गंगाधर कळलावे, शिक्षण तज्ज्ञ
२६. डॉ. मधुश्री संजीव सावजी, शिक्षण तज्ज्ञ
२७. डॉ. अजय दिगंबर महाजन, शिक्षण तज्ज्ञ
२८. डॉ. अशोक भोसले, शिक्षण तज्ज्ञ
२९. श्री. श्रीपाद मथुराकांत ढेकणे, शिक्षण तज्ज्ञ
३०. श्री. महादेव सखाराम जाधव, शिक्षण तज्ज्ञ
३१. श्री. नारायण वासुदेव मराठे, शिक्षण तज्ज्ञ
३२. श्री. अंकेश ललितप्रसाद शाहू, शिक्षण तज्ज्ञ
३३. श्रीम. शोभना प्रकाश भिडे, शिक्षण तज्ज्ञ
३४. श्री.भरत सडकगावडे,सेवानिवृत्त शिक्षक
३५. श्रीम. सुषमा प्रवीण मांजरेकर
३६. डॉ. नेहा जगटियानी, प्राचार्य नॅशनल कॉलेज, मुंबई
३७. आयुक्त (सर्व) महानगरपालिका,
३८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३९. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
४०. प्राचार्य, शिक्षण सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संख्या (सर्व),
४१. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम दक्षिण/उत्तर
४२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना जिल्हा परिषद, (सर्व),
४३. प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी, महानगरपालिका (सर्व),
४४. निवडनस्ती (एसडी-४).